सोमवार, दि. १२ मे २०२५
सुराज्य सोलापूर



# OPERATION SINDOOR 2:0



# युद्धविराम झाला असला तरी खेळ संपलेला नाही

**मुंबई : भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव अखेर निवळला आहे. भारत पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधीवर एकमत झाले आहे. पाकिस्तानने केलेल्या विनंतीनंतर भारताने शस्त्रसंधीचा निर्णय घेतल्याचे भारत सरकारकडून सांगण्यात आले आहे. युद्धविराम झाला असला तरी खेळ संपलेला नाही. सोमवार, १२ मेचा दिवस महत्वाचा ठरणार आहे.**

शनिवारी पाच वाजल्यापासून दोन्ही देशात युद्धविराम झाल्याची माहिती केंद्रीय परराष्ट्र मंत्रालय सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकारपरिषद घेऊन दिली आहे. तर पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनी देखील यास दुजोरा दिला आहे. दोन्ही देशांनी चर्चा करुन हा निर्णय घेतला आहे. आज संध्याकाळी ५ वाजल्यापासून शस्त्रसंधी झालेली आहे. त्यानुसार दोन्ही देशांकडून भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून जमिनीवर, हवेत आणि समुद्रात सुरु असलेला गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र तसे असले तरी हा युद्दाचा खेळ पूर्णपणे संपला असे म्हणता येणार नाही. कारण १२ मे ला आणखी एक महत्वाची घडामोड घडणार आहे.

भारत आणि पाकिस्तानचे लष्करी अधिकारी १२ मे रोजी बैठक घेणार आहेत. यासंदर्भात भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी माहिती दिली आहे. पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी आज दुपारी ३.३५ वाजता भारतीय लष्कराच्या महासंचालकांना फोन केला. त्यात युद्धजन्य परिस्थिती थांबवण्यावर चर्चा झाली. त्यानंतर ५ वाजेपासून दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. दोन्ही देशांत सध्या शस्त्रसंधी झालेली असली तरी अद्याप हा तणाव पूर्णपणे निवळलेला नाही. याच कारणामुळे येत्या १२ मे रोजी दोन्ही देशांच्या डिजीओंमध्ये चर्चा होणार आहे. या चर्चेत शस्त्रसंधीच्या अटी आणि इतर गोष्टींवर चर्चा होणार आहे. ही चर्चा सकारात्मक ठरली तर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध टळेल अन्यथा भविष्यात काहीही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आजचा दिवस महत्वाचा ठरणार




भारत पाकिस्तान यांच्यातील युद्धविरामासाठी मध्यस्थी केल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यांनी याबद्दल एक्सवर एक पोस्ट केली आहे. अमेरिकेने काल रात्रभर मध्यस्थीसाठी बोलणी केली. त्यात भारत आणि पाकिस्तान पूर्ण आणि तात्काळ शस्त्रसंधीसाठी तयार झाले. त्याबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो अशी माहिती ट्रम्प यांनी दिली आहे.

### दक्षिण आशियात शांतता नांदावीः इशाक डार

पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनी देखील दोन्ही देशांत शस्रीसंधी झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी सोशल मीडियावर याबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. 'भारत आणि पाकिस्तानने तत्काळ शस्त्रसंधी करण्याबद्दल सहमती दर्शवली. पाकिस्तानने कायमच प्रदेशातील शांतता आणि सुरक्षेसाठी प्रयत्न केले आहेत. दक्षिण आशियात शांतता नांदावी यासाठी आम्ही नेहमीच आग्रही भूमिका घेतली आहे', असे डार यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

## 'बिग बी' यांनी मौन सोडलं! कवितेतून व्यक्त केला संताप

### सलमान खान म्हणतो, युद्धविराम झाल्याबद्दल आभा




**मुंबई :** काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यावर देशभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर 'बिग बी' अमिताश बच्चन यांनी १९ दिवसानंतर मौन सोडले आहे. सोशल मीडियावर अमिताभ बच्चन यांनी कविता पोस्ट करीत पहलगाम घटनेवर आपला संताप व्यक्त केला आहे.

या घटनेवर बाबूजींची (हरिवंशराय बच्चन) कवितेची ओळ आठवली असे अमिताभ बच्चन यांनी म्हटलं आहे. भित्र्या राक्षसाने निघृणपणे हत्या केला..., मुलगी मोदींकडे गेली अन् म्हणाली, है चिता की राख कर में, माँगती सिंदूर दुनिया ... अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांची पोस्ट व्हायरल होत आहे. नेटकरी त्यावर प्रतिक्रिया देत आहेत.

युद्धविरामाची घोषणा झाल्यावर अभिनेता सलमान खानने सोशल मीडियावर एक पोस्ट लिहिली होती. त्यामुळे भाईजानला ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. पुढे सलमानने काहीच क्षणात ती पोस्ट त्याने डिलिट केली. सलमानने त्यात काय लिहिलं होते याची चर्चा आता होत आहे. युद्धविराम झाल्याबद्दल देवाचे खूप आभार. अशा शब्दात सलमानने पोस्ट काल पोस्ट लिहिली होती. ही पोस्ट लिहिल्यानंतर सलमानने काहीच क्षणात ही पोस्ट आपल्या अकांऊटवरुन हटवली. या पोस्टवर नेटकऱ्यांनी सलमानला चांगलेच धारेवर धरलं. सलमानने गेल्या काही दिवसांपासून युद्धजन्य परिस्थिती आणि ऑपरेशन सिंदूरवर काहीच भाष्य केलं नाही. आता युद्ध थांबताच सलमानने पोस्ट केली आणि ती डिलीटही केली.

तर दुसरीकडे 'सनम तेरी कसम' या सिनेमाचा अभिनेता हर्षवर्धन राणेने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करीत मोठी घोषणा केली आहे. सध्याची भारत-पाकची जी परिस्थिती आहे आणि माझ्या देशाबद्दल ज्या प्रतिक्रिया मी वाचतोय त्यामुळे मी एक निर्णय घेतला आहे. जर सनम तेरी कसम २ मध्ये आधीचे कलाकार पुन्हा असतील तर या सिनेमात मी काम करण्यास नकार देईल. अशा स्पष्ट शब्दांमध्ये हर्षवर्धनने त्याची नाराजी प्रकट केली आहे.

## सीमेपलीकडून भारतावरील सायबर हल्ले तीव्र

### उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर आक्षेपार्ह मजकूर झळकला

**उल्हासनगर :** भारत आणि पाक या दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी झाली. परंतु पाकिस्तानने शस्त्रसंधीचं उल्लंघन करत पुहा हल्ले सुरू केले. भारत-पाकिस्तान देशामध्ये युद्धजन्य स्थिती असतानाच, सीमेपलीकडून भारतावरील सायबर हल्ले तीव्र झाले आहे. उल्हासनगर महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर काल शनिवारी दुपारी अल्लाहू अकबर, यू हेव्ह बिन हॅक', असा आक्षेपार्ह मजकूर झळकला आणि काही काळासाठी प्रशासनासह नागरिकांमध्ये खळबळ उडाल्याचा प्रकार घडला.

या सायबर हल्ल्यांमध्ये सरकारी, खासगी आस्थापना, संवेदनशील प्रकल्पांसोबत सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती राज्याच्या सायबर विभागाकडून देण्यात आली. संस्थात्मक डिजिटल संसाधनांवरील हल्ल्यांसोबतच सीमेपलीकडील संघटित हॅकर टोळ्यांनी आता मालवेअर संक्रमित फाइलचा प्रसार सुरू केला आहे. या फाइल एखाद्या सरकारी दस्तऐवजाच्या रूपात समाजमाध्यमे आणि ई-मेलद्वारे नागरिकांच्या मोबाईलवर येऊन धडकत आहेत. त्या उघडताच अपायकारक हालचाली सुरू होऊन डेटा चोरी किंवा विस्तृत नेटवर्क समूहाला अपाय संभवतो.

अज्ञात स्रोतांकडून आलेल्या लिंक, संलग्न फाइल उघडण्यापूर्वी ती पाठविणाऱ्या व्यक्ती, समूहाची ओळख तपासावी. अद्ययावत अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर, नियमित प्रणाली तपासणी, सुरक्षित लॉगिनपद्धती आणि द्वि-स्तरीय प्रमाणिकरणाचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे, अशी सूचना सायबर विभागाने जारी केल्या आहेत.

दरम्यान, उल्हासनगर महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर काल शनिवारी दुपारी अल्लाहू अकबर, यू हेव्ह बिन हॅक', असा आक्षेपार्ह मजकूर झळकला आणि काही काळासाठी प्रशासनासह नागरिकांमध्ये खळबळ उडाल्याचा प्रकार घडला. या प्रकरणात पाकिस्तानी हॅकर्सचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र पालिकेच्या आयटी टीमने तत्काळ प्रतिक्रिया देत हा सायबर हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. आयुक्तांच्या आदेशानंतर महापालिकेची अंभियत्यांनी हे संकेतस्थळ ऑफलाइन केले. प्राथमिक माहितीनुसार, हॅकिंगचा हा प्रयत्न परकीय सायबर गुन्हेगारी गटांकडून (विशेषतः पाकिस्तानी हॅकर्स) झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.



### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

महापालिकेच्या आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी उल्हासनगर महापालिकेच्या वेबसाईटवर झालेल्या सायबर हल्ल्याचा प्रकार गंभीर असून, आमच्या आयटी विभागाने तत्काळ कृती करत तो प्रयत्न निष्फळ केला आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये व अधिकृत माहितीची वाट पाहावी. सायबर सुरक्षेबाबत महापालिका पूर्ण सज्ज आहे, असे सांगितले.

## युद्धविराम अन् इंदिरा गांधींबाबत शशी थरुर स्पष्टच बोलले



**मुंबई :** भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतर राजकीय वातावरण तापले आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीने युद्धविराम झाल्यामुळे अनेक विरोधी नेते सरकारवर टीका करत आहेत. काँग्रेस नेते तर १९%१चे युद्ध आणि आताच्या संघर्षाची तुलना करत माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांचा मुद्दा उपस्थित करत आहेत. या दरम्यान काँग्रेस खासदार शशी थरुर यांनी मात्र संतुलित भूमिका घेतली आहे.

मीडियाशी संवाद साधताना शशी थरुर म्हणाले की, '१९७१ आणि २०२५ ची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. सध्या भारतासाठी शांतता आणि स्थैर्य हे प्राथमिक उद्दिष्ट असले पाहिजे. यावेळी भारताने दहशतवाद्यांना धडा शिकवण्यासाठी कारवाई केली होती, जी आता पूर्ण झाली आहे. आता उगीच युद्ध चालू ठेवण्यात अर्थ नाही. भारताने आपल्या आर्थिक प्रगतीवर आणि नागरिकांच्या सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करावे आणि दीर्घकालीन युद्धात अडकू नये.'

थरुर पुढे म्हणतात, '१९७१ च्या युद्धाचे एक नैतिक उद्दिष्ट होते. ते युद्ध बांग्लादेशच्या स्वातंत्र्यासाठी लढले गेले होते. त्यावेळी भारत नागरिकांच्या स्वातंत्र्यासाठी लढत होता. आज परिस्थिती वेगळी आहे. पाकिस्तानची लष्करी भूमिका, तांत्रिक क्षमता आणि धोरणात्मक विचारसरणी बदलली आहे. आता पाकिस्तानसोबत दीर्घकाळ युद्ध सुरू ठेवले, तर दोन्ही बाजूने मोठी जीवित आणि वित्तहानी होईल. आजच्या भारताला फक्त सूड हवा नाही तर स्थिरता हवी आहे,' असेही ते यावेळी म्हणाले.

## दहशतवाद्यांना स्थानिकांची मदत

**काश्मीरमध्ये २० ठिकाणी छापे, स्लीपर सेल मॉड्यूलचा पर्दाफाश**

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, सरकारने दहशतवादी आणि त्यांना मदत करणाऱ्यांविरोधात मोहीम तीव्र केली आहे. यादरम्यान पोलिसांनी दक्षिण काश्मीरमध्ये २० ठिकाणी छापे टाकून स्लीपर सेल मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह वस्तूही जप्त करण्यात आल्या. तसेच, काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांची चौकशी सुरू आहे.

राज्य तपास संस्थेने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, जम्मू-काश्मीर पोलिस काश्मीरमध्ये कार्यरत असलेल्या दहशतवादी सहकाऱ्यांवर आणि ओव्हरग्राउंड वर्कर्सवर लक्ष ठेवून आहेत. गुप्तचर यंत्रणेने उघड केले आहे की, काश्मीरमधील अनेक स्लीपर सेल पाकिस्तानमध्ये बसलेल्या त्यांच्या आकांच्या थेट संपर्कात होते आणि व्हॉट्सअॅप, टेलिग्राम, सिग्नल इत्यादी मेसेजिंग अॅप्सद्वारे सुरक्षा दल आणि महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती पुरवत होते. असेही सांगितले जात आहे की, हे स्लीपर सेल लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवादी कमांडर्सच्या आदेशानुसार ऑनलाइन कट्टरपंथी प्रचारात देखील सहभागी होते. यामुळे राष्ट्रीय सुरक्षा आणि अखंडतेला धोका निर्माण झाला आहे. यावर राज्यातील सुरक्षा यंत्रणा तीव्र कारवाई करत आहेत.

## शस्त्रसंधीनंतर आंतरराष्ट्रीय माध्यमांत चर्चा सुरू



**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे कट्टरतावाद्यांनी २२ एप्रिलला केलेल्या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानात तणाव निर्माण झाला होता. दोन्ही देशांनी एकमेकांविरोधात सैन्य कारवाया केल्यानंतर हा तणाव वाढीला लागला. मात्र काल अचानक दोन्ही देशांनी शस्त्रसंधीला सहमती दिली आणि हा तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला. अर्थात त्यानंतर शस्त्रसंधीचं उल्लंघन झाल्याचा आरोपही दोन्ही देशांनी एकमेकांवर केला. परदेशातील माध्यमांमध्ये या शस्त्रसंधी आणि त्याच्या उल्लंघनाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. जगातील प्रसिद्ध दैनिकांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्याबद्दल लेख प्रसिद्ध झाले आहेत.




### अमेरिकन माध्यमांत काय चर्चा आहे?

न्यू यॉर्क टाइम्समध्ये लिहिलंय, चार दिवस ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानात शस्त्रसंधीवर सहमती झाली आहे. मात्र काही वेळातच सीमेवर गोळीबार सुरू असल्याची बातमी आली. न्यू यॉर्क टाइम्स लिहितं, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर शस्त्रसंधीची घोषणा केली आणि अमेरिकेने यात मध्यस्थी केली. भारत आणि पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी शस्त्रसंधी झाल्याचं स्पष्ट केलं. परंतु पाकिस्ताननेच फक्त अमेरिकेच्या भूमिकेचा स्वीकार केला.



### ब्रिटनमधील माध्यमांनी काय लिहिलं?

ब्रिटेनमधील टेलिग्राफ लिहितं, भारत आणि पाकिस्तान युद्धाच्या जवळ पोहोचले होते. याआधी या दोन देशांमध्ये याप्रकारचे हल्ले १९७१ च्या युद्धावेळी झाले होते. त्या युद्धानंतर बांगलादेश स्वतंत्र झाला आणि मगच युद्ध संपलं. भारताने पाकिस्तानच्या तीन हवाई तळांना लक्ष्य केलं. पाकिस्तानकडूनही प्रत्युत्तरादाखल भारतावर जेट हल्ले केले. १९७१आणि आजच्या स्थितीत महत्त्वाचा फरक म्हणजे तेव्हा दोन्ही देशांकडे अण्वस्त्रं नव्हती, आज मात्र दोन्ही देशांकडे ती आहेत.



### बांगलादेश आणि नेपाळच्या माध्यमांनी काय लिहिलं?

बांगलादेशातील इंग्रजी वर्तमानपत्र द डेली स्टार लिहितं, गेल्या तीन दशकातील दोन दक्षिण आशियाई देशांतली ही सर्वात भीषण लढाई होती. यामुळे व्यापक युद्धाची सुरुवात होण्याचा धोका होता. या लढाईत अण्वस्त्रं वापरण्याचा धोकाही तयार झाला होता. कारण आपल्या अण्वस्त्र संबंधी उच्चस्तरीय मंडळाची बैठक घेण्याचं पाकिस्ताननं जाहीर केलं होतं. द डेली स्टार वर्तमानपत्रानं लिहिले. नेपाळमधील काठमांडू पोस्ट लिहितं, दक्षिण आशिया केंद्रातील अटलांटिक कौन्सिलच्या संशोधक शुजा नवाज म्हणतात, आता येत्या दिवसात सिंधू जलकरारावर प्रामुख्याने चर्चा होईल. यातून जे प्राप्त झालं त्याचं दोन्ही देशांच्या सरकारांना श्रेय घेण्याची संधी मिळेल.

### अरेबिक माध्यम काय म्हणते?

अरब न्यूज डॉट कॉम लिहितं, भारत आणि पाकिस्तानने एकमेकांवर हल्ले करून शस्त्रसंधी मोडल्याचा आरोप केला. दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी झाल्याची डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा करताच काही वेळातच हे आरोप झाले. चार दिवस ड्रोन, क्षेपणास्त्र आणि जेट फायटर हल्ले-प्रतिहल्ले झाल्यानंतर शनिवारी (१० मे) दोन्ही देशांनी शस्त्रंसधीला मंजुरी दिली. या हल्ल्यांत किमान ६० लोकांचा मृत्यू झाला. सीमेवर राहणाऱ्या लोकांना आपली घरं सोडावी लागली. शस्त्रसंधीची घोषणा ट्रम्प यांनी केली ही गोष्ट चकीत करणारी होती.



## पाकिस्तान पूर्णपणे भिकारी देश :ओवेसी

**मुंबई :** भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे हात पसरले असून १ अब्ज डॉलर्सचे कर्ज मागितले आहे. हे कर्ज मंजूर होणार असल्यामुळे एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी नाराजी व्यक्त केली.

ते म्हणाले, पाकिस्तान हे एक भिकारी राष्ट्र आहे. आयएमफ पाकिस्तानला कर्ज देऊन मोठी चूक करत आहे. त्यांना हिंदू-मुस्लिमांमध्ये फक्त संघर्ष व्हावा, एवढाच पाकिस्तानचा प्रयत्न असतो, अशी टीका त्यांनी केली.

हैदराबाद येथील एका कार्यक्रमात बोलत असताना ओवेसी यांनी पाकिस्तानवर टीका केली. तसेच एएनआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीमध्येही त्यांनी पाकिस्तानला सुनावले. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने आयोजित केलेल्या सर्वपक्षीय बैठकीतही असदुद्दीन ओवेसी यांनी केंद्र सरकारच्या कारवाईला आपला पाठिंबा दर्शिवला होता. तसेच पाकिस्तानला धडा शिकविण्याची मागणी त्यांनी केली होती.

### दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी इस्लामचा वापर

ओवेसी पुढे म्हणाले, पाकिस्तान भारताला धर्माच्या आधारावर विभागू पाहत आहे. त्यामुळेच हिंदू आणि मुस्लीम तसेच इतर धर्मीयात वाद कसे निर्माण होतील, याचा ते प्रयत्न करतात. पाकिस्तान फक्त बेकायदेशीर काम आणि दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी इस्लामचा वापर करत आला आहे. मागच्या ७५ वर्षांपासून ते भारताविरोधात हेच करत आहेत.